# प्रकरण चार

## आरोग्य विभाग

**4.345 कालबाहय (EXPIRY DATE) झालेली औषधे अंगणवाडीना पुरवठा केलेबाबत.**

**पंचायत समिती राहुरी, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती राहुरी, अंतर्गत एकात्मिक बाल विकास विभागाच्या अंगणवाडीना सन 2014-2015 मध्ये कालबाहय झालेल्या औषधांचा पुरवठा केला गेला आहे. वांबोरी बीट मधे साठा नोंदवहीची तपासणी केली असता दिनांक 24/4/2014 रोजी सदर अंगणवाडीस TONEX SYRUP या औषधाच्या एकुण 23 बाटल्यांचा पुरवठा केलेची नोंद आहे. सदर औषधाची EXPIRY DATE मार्च 2014 अशी नमुद केलेली आहे. यावरून असे दिसून येते कि, सदर औषधाचा पुरवठा औषध कालबाहय झाल्यानंतर संबंधीत अंगणवाडीला केलेला आहे. सदर कालबाहय झालेली औषधे अंगणवाडीत येणा-या बालकांना पुरवली जातात किंवा कसे? या बाबत नोंदवहीवरून बोध होत नाही. संबंधीत अंगणवाडी सेविका यांचे तोंडी सांगण्यावरून कालबाहय झालेली औषधे त्यांच्या स्तरावरून फेकुन देऊन नष्ट केली जातात, अभिलेख्या अभावी अशी खात्री करता आली नाही.

**4.346 एकाच कालावधीचा महागाई भत्ता फरक चार वेळा आदा केलेबाबत.**

**पंचायत समिती कोरेगांव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** प्राथमिक आरोग्य केंद्र वाठार स्टेशन, पंचायत समिती कोरेगावची वेतन देयके पडताळता 4 प्रमाणकान्वये (ऑक्टोबर 2014 ते जानेवारी 2015 ची वेतन देयके) एकूण 23,600/- एकाच कालावधीचा महागाई भत्ता चार वेळा आदा केल्याचे आढळून आले. श्रीमती सुर्यवंशी ए.डी. आरोग्य सेविका यांना माहे जानेवारी 2014 ते एप्रिल 2014 चा महागाई भत्ता फरक रुपये 5,900/- चार महिन्यांच्या वेतन देयकात आदा केलेला आहे. यास्तव यास्तव अतिप्रदान रक्कम रुपये 23,600/- सव्याज वसुली करणे आवश्यक आहे.

**4.347 औषध खरेदीबाबत.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती फलटण, अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांनी रुपये 16,992/- ची औषधे खरेदी केली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र बरड यांनी नमोकार मेडिकल्स, फलटण कडून ORS 21 gmचे प्रति नग रुपये 4.25 प्रमाणे 1075 नग खरेदी केली आहे. तथापि साठा नोंद व वाटपाबाबत नोंदी आढळल्या नाहीत.

2) प्राथमिक आरोग्य केंद्र गिरवी यांनी ORS नग 300 रुपये 10/- प्रतिनग प्रमाणे खरेदी केली आहे. उपरोक्त 1 प्रमाणे दरात तफावत आढळते. तसेच सदर खरेदी अधिकृत पुरवठादाराकडून केल्याचे दिसत नाही. जानेवारी 2015 व मार्च 2015 मधील एकूण सहा प्रमाणकाद्वारे सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी खरेदी आहे. तथापि एकसारखी औषधे एाकच दरात खरेदी केली नसल्याचे दिसते. याबाबत सक्षम कागदपत्रे, साठा नोंदवही, औषध वाटप व विनियोग, खरेदी आवश्यकता व दर करार आहे किंवा नाही इत्यादीबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

3) सदर आवश्यक औषधांची खरेदी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन एकत्रित न करता खरेदी प्रक्रिया तुकडे करुन केली आहे. त्यामुळे वेगवेगळया दराने खरेदी केल्याने कमी/जादा दराने औषधे खरेदी झाली आहे.

**4.348 प्राथमिक आरोग्य केंद्र धामोड मधील आर्थिक गैरव्यवहार व अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती राधानगरी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती राधानगरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र धामोड मधील रक्कम रुपये 1,57,317/- चा आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) पंचायत समिती मधून आहरीत रकमांच्या वितरणामधील गैरव्यवहार- प्राथमिक आरोग्य केंद्र धामोड कडील वेतनभत्ते रोजकिर्द (नमुना नंबर 4 रोकडवही) ची तपासणी केली असता पंचायत समितीमधून प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांच्या आहरीत वेतन भत्ते व इतर मागणीच्या रकमा जिल्हा मध्यवर्ती बँक खात्यावर जमा करुन त्या त्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बँक खाती जमा अथवा वितरीत केल्याच्या नोंदी आरोग्य केंद्राच्या रोकडवहीत (नमुना नंबर 4) मध्ये घेणे आवश्यक असताना दिनांक 01/04/2014 ते 18/03/2015 या कालावधीतील नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्राने पंचायत समिती मधून आहरीत केलेल्या रकमांची बँक याद्या स्थळप्रत व बँक स्क्रोल यांचा मेळ घेतला असता सदर रकमांच्या वितरणामध्ये आरोग्य केंद्राकडून गैरव्यवहार झाला आहे.

1) पत्र क्रमांक 37, दिनांक 09/10/2014 अन्व्ये रक्कम रुपये 24,951/- आहरीत केले आहेत. त्यामध्ये श्री. जगदिश नामदेव कांबळे रक्कम रुपये 10,550/- व श्री. कुमार श्रीपती बील्ले रक्कम रुपये 14,401/- प्रमाणे वेतनाची रक्कम त्यांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक असताना श्री. जगदिश नामदेव कांबळे यांचे वैयक्तीक खाती रक्कम रुपये 24,951/- जमा केल्याने कांबळे यांना देय रकमेपेक्षा रक्कम रुपये 14,401/- जादा वितरीत केल्याने सदर रकमेचा गैरव्यवहार झालेला आहे.

2) आयुर्वेदिक दवाखाना म्हसुर्ली येथील परिचर यांच्या प्रवास भत्त्याची रक्कम रुपये 4,760/- आहरीत केली असताना त्यांच्या खाती 4,936/- जमा केल्याने रक्कम रुपये 176/- जादा जमा केली आहे.

3) कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेल्या पोस्ट आवर्ती ठेवीच्या रकमा संबंधित कर्मचाऱ्याच्या वैयक्तीक पोस्ट बचत ठेव खाती पोस्टात जमा केल्या असल्याबाबत पोस्ट खात्याकडील पोहोच अथवा पोस्ट खात्याकडील तपशील प्राप्त झालेला नाही तसेच ग्राम आरोग्य संजीवनी योजनेच्या आहरीत केलेल्या रकमा अरेखांकित धनादेशाद्वारे रोख स्वरुपात खर्च पडल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम रुपये 1,37,900/- चा गैरव्यवहार झाल्याबाबत साशंकता निर्माण होते.

ब) बाह्यरुग्ण शुल्क वसुली व बँक भरणा मधील अनियमितता-

1) सन 2014-2015 बाह्यरुग्ण शुल्क आरंभिची शिल्लक शुन्य नमूद मागील वर्षाची रोकडवही प्राप्त नसल्याने प्रमाणित करता आली नाही.

2) रोकडवहीप्रमाणे दिनांक 31/12/2014 रोजी बाह्यरुग्ण शुल्क शिल्लक रक्कम रुपये 452/- जिल्हा परिषद स्वनिधी बँक खाती जमा नाही.

3) दिनांक 01/01/2015 ते 31/03/2015 कालावधीत वसूल बाह्यरुग्ण शुल्क रक्कम बँक खाती जमा नाही. बाह्यरुग्ण तपासणी नोंदवहीवरुन शुल्क वसूली पात्र 2,194 रुग्णांची प्रती रुग्ण 2/- रुपये प्रमाणे रक्कम रुपये 4,388/- बँक खाती संबंधिताकडून रक्कम वसुल करुन जमा करणे आवश्यक.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 49 प्रमाणे रक्कम रुपये 100/- पेक्षा अधिक जमेच्या रकमा 24 तासाच्या आत बँक खाती भरणा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

क) प्राथमिक आरोग्य केंद्र लेख्यातील इतर अनियमितता-

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 36(1) प्रमाणे सदर अफरातफर उघडकीस आल्यानंतर वस्तुस्थिती बाबतचा अहवाल तात्काळ स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

2) वैद्यकीय अधिकारी यांनी धनादेश स्वाक्षरी करण्यापूर्वी रोकडवहीत नोंद केल्याची व खर्चाची प्रमाणके असल्याची तसेच वेतनातून शासकीय व अशासकीय कपात रकमा त्या त्या खाती जमा केल्याची तसेच बँकेत कर्मचाऱ्यांचे वेतन जमा करताना बँकेस सादर केलेली यादी व त्यात नमुद रक्कम व नावे यांची खात्री करणे आवश्यक असताना तशी खात्री केली नाही त्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांच्या कर्तव्यात सकृतदर्शनी कसूर झाल्याचे दिसून येते.

3) लेखासंहिता नियम 29(4) व 34(1) प्रमाणे 1,000/- वरील रकमेचे धनादेश रेखांकित धनादेशाने आदा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

4) लेखासंहिता नियम 63 प्रमाणे वेतन व भत्ते रोकडवही व बाह्यरुग्ण शुल्क रोकडवही मधील शिल्लक व बँक खाती शिल्लक रकमेचा दरमहा मेळ घेण्यात आलेला नाही.

5) लेखासंहिता नियम 26(1) प्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राने धनादेश साठा नोंदवही (नमुना 1) व नियम 55 प्रमाणे प्राप्त धनादेश, वित्तप्रेषण तसेच नियम 91 प्रमाणे साठा नोंदवही (नमुना 33) यांची नोंदवही ठेवली नाही.

6) रोकड नोंदवहीत प्राप्त निधी व केलेला खर्च याचे मासिक व वार्षिक गोषवारे काढले नाहीत.

7) रोकड नोंदवहीतील पाने पृष्ठांकित व मोहरबंद केलेली नाही.

8) पगार पत्रकावर कर्मचाऱ्यांच्या मुद्रांक तिकीट लावून स्वाक्षरी घेतलेल्या नाहीत.

**4.349 प्राथमिक आरोग्य केंद्र टेंब्रुसोंडा येथील मानव विकास शिबीर आयोजन खर्चातील अनियमीतता (शासकीय निधी).**

**पंचायत समिती चिखलदरा, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती चिखलदरा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र टेंब्रुसोडा येथे आयोजीत केलेल्या आरोग्य तपासणी शिबीरावर रक्कम रुपये 1,04,500/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महराष्ट्र शासन नियोजन विभाग मुंबई यांचे पत्र क्रमांक माविका-2013/प्र क्र 21/का-1418, दिनांक 3 डिसेंबर 2013 नुसार आहार व तंबुसाठी जिल्हास्तरावर निविदा काढणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत दस्तएवज तपासणीस उपलब्ध झाले नाही.

2) भाड्याने घेतलेल्या वाहनाबाबत दरपत्रके मागवण्यात आली नाही.

3) शिबीरात किती महीला व बालकांची तपासणी केली याबाबत यादी देयकासोबत आढळून आली नाही.

4) शिबीरासाठी वापरण्यात आलेल्या वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे वाहनाच्या डीझेलवर करण्यात आलेला खर्च योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे औषधीची मागणी न करता व त्यांचे नाहरकत प्रमाणपत्र न घेता औषधी खरेदी करण्यात आली आहे.

6) प्रत्यक्ष प्रमाणकापेक्षा देयकात रुपये 682/- जादा खर्च दर्शवला आहे. सदर रक्कम वसुल करण्यात यावी.

**4.350 आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना संबंधीत प्रशासकीय विभागांची मंजूरी न घेता कायम प्रवास भत्ता अदा करणेबाबत.**

**पंचायत समिती बाळापूर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना विहीत मर्यादेपेक्षा जादा कायम प्रवास भत्ता अदा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राज्य शासनाच्या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुंबई नागरी सेवा नियत 1959 चे नियम 383 नुसार कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय आहे. सार्वजनीक आरोग्य विभागाचे शासन नियम नुसार अनुज्ञेय कायम प्रवास भत्ता दरात शासन निर्णय क्रमांक सघह/1002/प्र.क्र.51/सेवा दिनांक 11/10/2006 नुसार 25 टक्के वाढ केली आहे. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहायक, आरोग्य सेवक पदावरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 03/03/2010 अन्वये कायम प्रवास भत्ता प्रदान केले आहे मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रवास भत्ता दरात फेरबदल करणे आवश्यक असतांना शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 03/03/2010 नुसार कायम प्रवास भत्ता दरात नियमबाह्यपणे वाढ करण्यात आलेली आहे. 11 कर्मचाऱ्यांचे प्रत्येकी 18,000/- प्रमाणे एकूण रूपये 1,98,000/- वसूल करण्यात यावे.

**4.351 आरोग्य विभागांतर्गतचे कर्मचाऱ्यांना संबंध्त प्रशासकीय विभागांची मंजूरी न घेता विहीत मर्यादेपेक्षा जादा दराने कायम प्रवास भत्याचे प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पातुर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, पातुर मधील आरोग्य विभागांतर्गत आरोग्य विभागांतर्गतचे कर्मचाऱ्यांना संबंधीत प्रशासकीय विभागांची मंजूरी न घेता विहीत मर्यादेपेक्षा जादा दराने कायम प्रवास भत्याचे प्रदान केल्याने रूपये 6,44,395/- चे प्रदानामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहायक, आरोग्य सेवक पदावरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 03/03/2010 अन्वये कायम प्रवास भत्ता प्रदान करण्यात आला.

2) सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रवास भत्ता दरात फेरबदल करणे आवश्यक असतांना शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 03/03/2010 नुसार कायम प्रवास भत्ता दरात नियमबाहयपणे वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे रक्कम रूपये 6,44,395/- संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

**4.352 आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना जादा कायम प्रवासभत्ता प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती रिसोड, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती रिसोड येथील सन 2014-15 चे लेखापरीक्षण दरम्यान आरोग्य विभागातील कर्मचारी यांचे वेतन देयकात देणाऱ्या कायम प्रवास भत्ता नियमबाहयपणे जादा प्रदानाबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी, आरोग्य सेवक, पर्यवेक्षक, सहाय्यक इत्यादींना महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास 1010/प्र.क्र.2/सेवा-5/दिनांक 03/03/2010 मधील मुददा क्रमांक 10 नुसार नियमबाहयपणे कायम प्रवासभत्ता रुपये 1,500/- व रुपये 1,650/- प्रमाणे प्रदान केला आहे.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक ए.एस.ओ.1090/1491/68/90 सेवा-6 दिनांक 19/01/1995 अन्वये कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय असतांना व त्यास शासन निर्णय क्रमांक 1002/प्र.क्र.151/सेवा-1 दिनांक 11/10/2006 नुसार 25 टक्के वाढ करणेत येवून आरोग्य सहाय्यक यांना रुपये 530/- वरुन रुपये 663/- व आरोग्य कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना रुपये 315/- वरुन रुपये 394/- प्रमाणे प्रदान करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता जादा प्रदान केलेले आहे.

3) वरील प्रमाणे एका महिन्याला रुपये 55,629/- जादा प्रदान झाल्याने संपुर्ण वर्षात रुपये 6,67,548/- जादा झालेले प्रदान लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**4.353 ब्लिचींग पावडर खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उमरखेड, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात ब्लिचींग पावडर खरेदी वर रुपये 39,928/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1096/प्र.क्र.1286/पा.पु-07,दिनांक 28/11/1996 अन्वये विहीत कार्यपध्दतीचा अवलंबुन 50 टक्के अनुदानावर टीसीएल पावडर ग्रामपंचायतीना पुरवठा करणेबाबत आदेशीत आहे. परंतू तसे न करता ग्रामपंचायतीना रोख रक्कम अदा करण्यात आली.

2) ग्रामपंचायतीला देण्यात आलेल्या रोख रक्कमेच्या एकाही ग्रामपंचायतीच्या नमुना 7 या पावत्या पंचायत समिती कडे उपलब्ध नाही. त्यामुळे संबधीतास रक्कम प्राप्त झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

3) ग्रामपंचायतीने प्राप्त रक्कमेतून खरेदी केलेल्या ब्लिचींग पावडर मध्ये 34 टक्के क्लोरीनचे प्रमाण असल्याबाबत चाचणी अहवाल नाही.

4) ग्रामपंचायती कडून 50 टक्के प्राप्त प्रतिपुर्ती रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ हयांचेकडे जमा करणे बंधणकारक आहे. परंतु रक्कम वसुलीबाबत व भरणाबाबत चलन उपलब्ध नाही.

**4.354 रोख भत्याचे नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मलकापुर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, नरवेल यांनी कनिष्ठ सहायक यांना प्रत्येकी रुपये 150/- रोख भत्ता नियमबाहय प्रदान केल्याचे आढळते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परीपत्रक क्रमांक वेपुर/1209/प्रक्रं.69/सेवा-9/ दिनांक 22/04/2009 अन्वये 6 वा वेतन आयोगाप्रमाणे विशेष वेतन / रोख भत्ता प्रदानाबाबत शासन आदेशात कुठलीही तरतुद नाही. पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक स्वास्थ केंद्र, उमाळी व नरवेल येथील कार्यरत कनिष्ठ सहायक यांना रोख रक्कम अनुज्ञेय नसतांना नियमबाहयपणे प्रदान केली. दिनांक 01/04/2014 ते 30/09/2015 पर्यंत रुपये 150/- प्रमाणे 18 महीन्याचे नियमबाहय प्रदान केलेली रोखभत्याची रक्कम कनिष्ठ सहायक यांचेकडुन प्रत्येकी रुपये 2,700/- प्रमाणे एकुण रुपये 5,400/- वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

**4.355 जिल्हा परिषद हायस्कुल मंगरुळ नवघरे येथील अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करणेबाबत.**

**पंचायत समिती चिखली, जिल्हा बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद हायस्कुल, मंगरुळ नवघरे चे अभिलेखे (रोख पुस्तक तथा सर्व अभिलेखे) लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्ध समास पत्र क्रमांक 09 दिनांक 06/11/2015 नुसार लेखापरिक्षण कालावधीत लेखी मागणी करुनही लेखा परिक्षणाचे शेवटचे दिनांकापर्यंत अभीलेखे उपलब्ध न केल्याने लेखापरिक्षण करता आले नाही.

2) मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 तथा सुधारणा 2011 चे कलम 6 अ व ब नुसार वारंवार मौखीक व लेखी मागणी करुन लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध केले नाही. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 तथा सुधारणा 2011 चे कलम 8 अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

**4.356 50 टक्के सुटीवर ब्लिचींग पावडर पुरवठा करणे बाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती कुही, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस/1088/2512/उद्योग-6, दिनांक 2/01/1992 व शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस/1093/2635/उद्योग-6, दिनांक 16/07/1993 नुसार रूपये 50,000/- पेक्षा जास्त रक्कमेच्या खरेदीकरिता वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असतांना त्यानूसार कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पं.स.7, दिनांक 19/10/2011 नुसार रूपये 1,00,000/- पेक्षा जास्त किमतीच्या साहित्याकरिता दिनांक 01/01/2012 पासुन ई-निविदा प्रक्रिया अवलंबने आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

3) संबधित ग्रामपंचायतींना ब्लिचींग पावडरची आवश्यकता असल्याबाबतचे मागणीपत्र नाही तसेच ग्रामपंचायतींना ब्लिचींग पावडर प्राप्त झाल्याची नमुना-7 ची पावती प्राप्त केली नाही.

**4.357 मानव विकास निर्देशांक शिबीर आयोजनातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मोहाडी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती, मोहाडीव्दारे मानव निर्देशांक अंतर्गत शिबिराचे आयोजन करतांना रक्कम रुपये 1,02,398/- खर्च रोखपुस्तकामध्ये नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद स्तरावरुन जेवण व डेकोरेशन याकरीता निविदा मागवुन दर स्विकृत करण्यात आले. त्यानुसार जय अंबे डेकोरेशन ॲन्ड कॅटरर्स, साकोली (53 रुपये प्रति प्लेट) प्रमाणे जेवण पुरवठा आदेश न देता मे. ताज बिछायत ॲन्ड डेकोरेशन यांना पुरवठा आदेश देवुन रक्कम प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे नियमाबाहयरित्या मे. ताज बिछायत ॲन्ड डेकोरेशन यांना रुपये 32,913/- चे प्रदान करण्यात आले.

2) लेखाशिर्षात रुपये 90,000/- ची तरतुद असतांना प्रमाणक क्रमांक 1393, दिनांक 16/03/2015 अन्वये रुपये 1,05,407/- खर्च करण्यात आला. त्यामुळे तरतुदीशिवाय खर्च रुपये 15,407/- लेखामान्य नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे कलम 151 व 152 तसेच 125 नुसार कोणतीही योजना राबविण्यापुर्वी प्रशासकीय व तांत्रीक मान्यता घेण्यात आली नाही.

**4.358 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करणेबाबत. (शासकीय क्षेत्र)**

**पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14)** - पंचायत समिती, लाखनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, मुरमाडीचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मागील सन 2013-2014 चे सुध्दा आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. पंचायत समिती, लाखनी कडुन सन 2014-2015 मध्ये अर्धसमाजपत्र क्रमांक 7, दिनांक 21/09/2015 अन्वये मागणी करुन आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र, मुरमाडी यांना खर्चाबाबत प्राप्त झालेल्या रकमांचा संदर्भात किरकोळ रोखवही व प्रमाणके व इतर आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

अभिलेखे सादर न केलेल्या संबंधितांवर स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 चे कलम 7 अन्वये तसेच शासनाने ठरवुन दिलेल्या रुपये 25,000/- पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**4.359 आरोग्य शिबीराच्या आयोजनावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21)** - लेखापरीक्षण वर्ष 2014-2015 मध्ये तालुका आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या आरोग्य शिबीराचे आयोजनावरील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आरोग्य शिबीराचे आयोजनाबाबत कृती आराखडा तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे कोणत्या बाबीवर किती खर्च करावयाचा होता याबाबतची तपासणी करता आली नाही.

2) उपप्रमाणक क्रमांक 1601, दिनांक 07/03/2015 अन्वये औषध खरेदी जनता मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स, सडक अर्जुनी येथुन केलेली असून सदर औषधी ही दिनांक 12/02/2015 रोजीच एक्सपायर झालेली होती. त्यामुळे यावर झालेला खर्च रक्कम रुपये 900/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. शिबीरात एक्सपायर झालेली औषधी वाटप करणे ही बाब गंभीर अनियमितता आहे. असे असून स्त्री रोग तपासणीसाठी रुपये 1,500/- स्त्रीरोग तज्ञास दिल्याबाबतचा खर्च दर्शविण्यात आला. उपरोक्त अनियमितता स्त्री रोग तज्ञास माहीती असणे अनिवार्य होते मात्र याबाबीकडे दुर्लक्ष करुन औषधाचे वाटप करण्यात आले. त्यामुळे शिबीराचा उददेश सफल झालेला नसून स्त्री रोग तज्ञांची फी रुपये 1,500/- सुदृधा लेखापरिक्षणास मान्य नाही.

**4.360 50 टक्के सुटीवर ग्रामपंचायतींना ब्लीचिंग पावडर पुरवठा योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती गोंडपिपरी यांनी स्थानिक निधीमधुन रुपये 29,700/- इतका प्रत्यक्ष खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जनसंधारण विभाग, यांचे परीपत्रक क्रमांक पंरास-2004/प्र.क्र.221/पंरा-5(35), दिनांक 9 मार्च, 2004 अन्वये पंचायत समिती, ग्रामपंचायतमार्फत खरेदी करण्यात येणारी ब्लिचिंग पावडर ही फक्त 5 किलोच्या पिशवीमध्ये खरेदी करण्यात यावी. 25 किलोची पोती मागविण्यात येऊ नये, अशा स्पष्ट सुचना असतांना पंचायत समिती गोंडपिपरीने सदर खरेदी केलेले ब्लिचींग पावडर हे 25 किलोची खरेदी केलेली असल्याने उपरोक्त शासन परिपत्रकाची अमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

2) लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये असे निर्देश असतांना संपुर्ण लाभार्थी हिस्सा वसुल केल्याशिवाय ब्लिचींग पावडर खरेदी करण्यात आल्याचे लेखापरीक्षणात आढळुन येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्राविवि/पीआरसी/1086/सीआर/10793, दिनांक 29/07/2006 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

4) साठा नोंदवहीनुसार साहीत्य दिनांक 24/12/2014 रोजी प्राप्त होऊन दिनांक 08/01/2015 ते 16/02/2015 ह्या कालावधीत वाटप केलेले आहे. उशिरा वाटप केलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु/ 1094/सीआर/896/39अ,दिनांक 14/06/2004 अन्वये ग्रामपंचायत हद्दित लोकांना शुध्द पाणी पुरवठा करणे हि प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. त्याकरीता आर्थिक तरतुद कमी पडत असल्यास निधी मिळणेसाठी पंचायत समितीकडे मागणी करणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही झाल्याचे लेखापरीक्षणात आढळुन आले नाही.

6) कोणत्या ग्रामपंचायतीस किती ब्लिचींग पाडवरची आवश्यक आहे याचा अहवाल घेतल्याचे नस्तीवरुन आढळुन आलेले नाही.

**4.361 प्राथमिक आरोग्य केंद्र, अडगाव यांनी केलेल्या रोख अदायीबाबत.**

**पंचायत समिती जिंतुर, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 43) -** वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अडगाव, तालुका जिंतुर यांनी आरोग्य केंद्राच्या साफसफाई साठी रुपये 25,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र, अडगाव यांनी जंगम मालमत्ता नोंदवही व साठा नोंदवही लेखापरीक्षणात सादर न केल्याने ज्या बाबींच्या दुरुस्तीवर त्यांनी खर्च केला आहे, त्या त्यांच्या मालकीच्या आहेत किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखसंहिता 1968 च्या नियम 29(4) अन्वये रुपये 1,000/- च्या वरील रकमा रेखांकित धनादेशाद्वारेच प्रदान करणे आवश्यक असताना, प्राथमिक आरोग्य केंद्र, अडगाव यांनी संबंधिताना या रकमा रोखीने प्रदान केल्याचे प्राप्त अभिलेख्यावरून दिसून येते.

**4.362 प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचा-यांनी संगणक अहर्ता प्राप्त केलेली नसतांना नियमबाहयपणे वेतनवाढ प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, क्रमांक सा.प्र.वि.नि.प्र.क्र. प्रशिक्षण-2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातस/नस्ती-14/224/39, दिनांक 07/07/2005 व दिनांक 09/06/2006 अन्वये कर्मचा-याने संगणक ज्ञान प्राप्त करणे आवश्यक

व सक्तीचे करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातस/नस्ती 4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये मुदतवाढ देवुन अंतिम समजण्यात यावी असे आदेश असतांनाही 03 कर्मचाऱ्यांनी संगणक अहर्ता प्राप्त केलेली नाही.

2) संबंधीत कर्मचाऱ्याकडून रक्कम रुपये 2,30,538/- एवढी वसुलात आणुन त्या त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्तता दर्शवावी रक्कम रुपये 2,30,538/- लेखापरीक्षणात शासन अनुदानासाठी अंतिम अमान्य करण्यात येते.